# कोरल कोव्हचं रहस्य

लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 274

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**कोरल कोव्हचं रहस्य : मधुकर हुद्दार**
© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ ०००/-

# कोरल कोव्हचं रहस्य

# १

‘‘आपलं हे पोलीस खातं म्हणजे एकदम धच्चड, भंकस, बकवास, एकदम थर्डक्लास! रात्रंदिवस डोक्याला ताप. पोलिसांच्या अंगात ताप नसतो, पण डोक्याला मात्र असतोच! थर्मामिटर फुटेल इतका ताप!

विश्रांती ती नाहीच. ड्युटी संपली की वाटतं, छान घरी गेल्यावर बायकोमुलांना घेऊन शॉपिंगला, भटकायला, लाँग ड्राईव्हला जाऊ पण, कसचं काय? ऐन निघते वेळी, फोन खणखणतो. काय तर, ताबडतोब निघून या. इमर्जन्सी आहे.

झालंऽऽ, बायकोचं रूसणं, मुलांचं हिरमुसणं. आगीत तेल नको म्हणून डोकं शांत ठेवा. बायकोनं टेबलावर आपटलेला कॉफीचा मग, गटागटा ढोसून युनिफॉर्म चढवा, अन् घटनास्थळी हजर व्हा, नाहीतर पोलीस ठाण्यात जा!

हे काय लाईफ आहे सालं! कधी खून, कधी दराडा, कधी घरफोडी. नंतर काय? पोलिसांनो पळाऽऽ पळा, खून झालेल्या व्यक्तीचे फोटो काढा, फिंगर प्रिंट्स पाहा, खुनी शोधा, संशयितांना पकडा, त्यांची जबानी घ्या, रेकॉर्ड शोधा, सालाऽऽऽ धत्ततेरी, फुकटची मगजमारी!

पुन्हा एवढ्यानं भागत नाही. पत्रकारांची कटकट असतेच! म्हणे पोलीस म्हणजे समाजाचे रक्षक, मित्र, सेवक. वाऽऽ काय गौरव? की रौख? माझ्या मते रौख ऊर्फ नर्क, हेच खरं!

पोलीस प्रामाणिक असतो म्हटलं, तर लोकांना तो जोक वाटतो!

म्हणजे पोलीस खातं काय खातं? पैसे खातं, डोकं खातं, मंत्र्याच्या, लोकांच्या शिव्या खातं. आपल्या आयुष्याचा आनंद खातं हेच, खरंय. आम्हाला

सुख नको, विश्रांती नको. पुढाऱ्यांना संरक्षण हवं, नागरिकांना शांतता व झोप हवी!! झोपाऽऽ नागरिकांनो तुम्ही झोपाऽऽ कारण आम्ही आहोत ना तुमचं रक्षण करायला?

''निदान सुखानं सिगारेट तर पिऊ द्या साले होऽऽ'' असा आत्मगत वैताग करीत, रात्रीच्या ड्युटीवर असलेल्या बिगलरनं, भिंतीवरील घड्याळाकडे तिरस्कारानं पाहिलं. पहाटेचे तीन वाजले होते.

बस ऽऽ अजून काही तास, मग सुट्टी. एक लांब झुरका मारून त्यानं धुराचा लोट, घड्याळाच्या दिशेनं सोडला व तिच्या काट्यांना लवकर फास्ट फॉर्वर्ड होण्याची बारीकमध्ये ऑर्डर दिली. अन् याच वेळी पोलिसांचा खरा दुश्मन असलेला असा तो फोन, खणखणला.

सार्जन्ट बिगलरनं रागानंच फोनकडे पाहिलं. फोन उचलू की नको? मनात द्वंद्व उत्पन्न झालं. बिगलर अडतीस वर्षांचा होता. अंगापिंडानं मजबूत, धिप्पाड, बिगलरनं आपला मजबूत लांब न केसाळ हात पुढं करून, शेवटी रिसीव्हर उचललाच.

''बिगलर बोलतोय.'' तो तिखट स्वरात म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावरील अप्रसन्नतेचा भाव अधिक गडद झाला होता.

''हॅरी ब्राऊनिंगचा फोन आहे सर'' फोन स्वीकारणारा चार्ली म्हणाला.

''त्याचा पारा चढलेला दिसतोय.''

हॅरी ब्राऊनिंग हा पॅरेडाईज शहरातील सर्वोत्तम व श्रेष्ठतम दर्जाच्या एका 'लोकोकिल' नामक रेस्टॉरंटचा मालक होता. या रेस्टॉरंटच्या शहरात वेगवेगळ्या भागात तीन शाखा होत्या. श्रीमंत शौकिनांचं, पर्यटकांचं आवडतं, असं हे रेस्टॉरंट होतं.

पॅरेडाईजसारख्या सुंदर शहराचा मेयर, हॅरी ब्राऊनिंगचा जिवलग मित्र होता. यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे, पोलीस चीफ टेरेलाचा तो विशेष मित्र होता. हॅरी सारख्या धंदेवाईकांना, पोलिसांशी मैत्री ठेवावीच लागते. पोलिसांनाही ती लाभप्रद असतेच! यामुळे बिगलरच्या दृष्टिनंही, हॅरी हा 'व्ही. आय. पी.' श्रेणाचा माननीय होता.

''ठीकाय, दे त्यांना.'' बिगलरनं चार्लीला सांगितलं अन् तोंडात सिगारेट धरून, डेस्कवर पडलेल्या कॉफीच्या रिकाम्या कार्टनकडे तिरस्कारानं पाहिलं.

बिगलरला दोन गोष्टींचा शौक होता. कॉफी अन् सिगारेटचा. बोलणं सुरू होण्यापूर्वीच त्यानं चार्लीला, कुणालाही पाठवून कॉफी आणायला सांगितलं.

''ठीकाय. हंऽऽ आता बोला.'' चार्ली म्हणाला.

बिगलरच्या कानावर तीव्र स्वरात त्याचंच 'बिगलर' हे नाव आदळलं.

''हॅलो मि. बिगलर.'' हॅरी म्हणाला.

''बोला मि. हॅरी ब्रॉडनिंग, मी आपली काय सेवा करू? आज्ञा करा.''

''इथं माझ्या रेस्टॉरंटमध्ये एक भयानक स्थिती निर्माण झाली आहे.''

''अहो, पण झालं तरी काय?''

''एक स्त्री तिच्या खोलीत मरून पडली आहे. तुम्ही ताबडतोब इकडे या.''

''म्हणजे मी जसा असेन तसा!''

''अरे होऽऽ तुमच्यासाठी हे नेहमीचं रूटीन काम असेल, पण माझ्या प्रतिष्ठेच्या व रेस्टॉरंटच्या लौकिकाच्या दृष्टीनं, ही बाब फारच गंभीर आहे. या घटनेबद्दल कोणत्याही वर्तमानपत्र अन् मासिकाच्या वार्ताहराला साधी कुणकुणही लागायला नको.''

''ठीकाय. तेवढी काळजी मी घेईन.''

''सार्जन्ट, सर्वांत महत्त्वाचं अन् तातडीचं म्हणजे इथं येऊन, आपल्या फॉर्म्यालिटीज लवकर आटोपून, या स्त्रीचं शव इथून ताबडतोब घेऊन जा. मी हे कां म्हणतोय हे तुमच्या लक्षात आलंच असेल.''

''आलं ना. मी येतोय. तुम्ही काळजी करू नका. अजून?''

''बस एवढचं! या तर लवकर'' हॅरी ब्राऊनिंग म्हणाला. अन् त्यानं फोन ठेवला.

बिगलर आपल्या खुर्चीत ताठ होऊन बसला. त्यानं फोनवर चार्लीला विचारलं,

''चार्ली, खाली कुणी रिपोर्टर आहे का?''

'' 'सन' चा हॅमिल्टन् आहे. नशापाणी करून झोपलाय का? काही विशेष?''

''सध्या मी काहीच सांगू शकत नाही. हे बघ चार्ली, मी बाहेर जातोय. हॅमिल्टननं विचारलंच, तर त्याला सांग की, दाढ दुखत असल्यामुळे ते घरी गेलेत.''

''ठीकाय सार्जन्ट.''

''ड्युटीवर कोण आहे?''

''मॅन्ड्रेक तुमच्यासाठी कॉफी आणायला गेलाय नि जॅक्सन डुलक्या देतोय.''

''त्याला इथं पाठव म्हणजे मी रिलीव्ह होईन. हेस आला की, त्याला मी खाली येईपर्यंत थांबवून ठेव. समजलं ना?''

''हो सर'' चार्ली उत्तरला.

बिगलरनं जॅकेट घातलं. हिप पॉकेटमधलं रिव्हॉल्व्हर हातानं चाचपडलं. सिगारेटचं पॉकेट खिशात घातलं, अन् एकदा फोनकडे हे आपलंच थडगं आहे. या भावनेनं पाहून, तो भरभर चालत जिना उतरून खाली आला.

होमीसाईड विभागाचा प्रमुख, फ्रेड हेस भिंतीला टेकून उभा होता. त्याच्या गोलाकार चेहऱ्यावर उबग आल्याचा भाव स्पष्ट दिसत होता.

बिगलर जवळ येताच तो म्हणाला,

''दोन मिनिटानंतर मी घरी जाणार होतो पण तुम्ही खाली येईपर्यंत थांबण्याचा निरोप चार्लीनं दिला. काय, भानगड काय आहे?'' फ्रेड हेसनं विचारलं.

''मलाही माहीत नाही.'' असं म्हणून बिगलर आपल्या पोलीसकारमध्ये बसला. हेस त्याच्या बाजूच्या सीटवर बसताच, त्यानं कार पुढं दामटली. सुनसान अशा रस्त्यावरून कार चालवताना बिगलर म्हणाला,

''लोकोकील रेस्टॉरंटमध्ये एक स्त्री मेली आहे. स्वत:च्या खोलीत, अन् हॅरीनं आकाश डोक्यावर घेतलंय. तो खूपच अस्वस्थ झालाय.''

''म्हणजे मर्डर खून आणखी काय?'' हेस.

''हॅरी मूडमध्ये नसल्यामुळे मी त्याला विचारलं नाही. कळेलच काय आहे ते'' बिगलर. समुद्राच्या काठानं त्याची कार धावत होती. रहदारी अशी नव्हतीच. समुद्राचा नीलवर्ण पाहात बिगलर म्हणाला,

''हेस, आपल्याला फारच सावधतेनं सतर्क राहून हे काम आटपायचं आहे. कारण हॅरी ब्राऊनिंग ही पॅरेडाईजमधील फार मोठी असामी आहे. त्याचे हात लांबवर पोचले आहेत'' बिगलरनं हेसला, हॅरीच्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव करून दिली.

''पण हा खुनाचा मामला असेल तर, व्यक्ती महान की लहान, यानं काय फरक पडतो?'' फ्रेड हेस.

''पण हा खून आहे की आत्महत्या हे अजून ठरायचं आहे. पण मला यातून हॅरीला अकलंकित ठेवायचं आहे, अन् कायदाही पाळायचा आहे.'' बिगलरनं आपली आंतरिक इच्छा प्रकट केली.

''म्हणजे मी ढवळाढवळ करू नये असंच ना?'' फ्रेड म्हणाला.

''तसं नाही, मला म्हणायचं आहे की, हॅरीच्या रेस्टॉरंटची बदनामी होणार नाही एवढीच काळजी आपल्याला घ्यायची आहे, बस.'' बिगलरनं खरा हेतू सांगितला.

''मग ठीक आहे.'' फ्रेड.

'लोकोकिल' रेस्टॉरंट प्रामिवेडच्या अगदी टोकाला होतं. रेस्टॉरंटभोवती हिरवेकंच लॉन्स होते. रंगीबेरंगी फुलांच्या रोपांनी, लतांनी, या हिरवळीचा शोभा वाढविली होती. याशिवाय पामवृक्षांनी हा सर्व भाग घेरून टाकला होता.

प्रवेशद्वारापर्यंत पोचायला, मार्बलच्या तीन लांब पायऱ्या होत्या. आत प्रवेश करताच ग्राहकाला प्रसन्नतेची धुंदी चढावी, अशी निसर्गसुंदर आरास रेस्टॉरंटच्या सभोवताली होती. हे लोकोकिल रात्री अडीचला बंद होत असे.

या वेळी भिंतीतील दिव्यांचा प्रकाश रेस्टॉरंटच्या काचेच्या दारापर्यंत पसरलेल्या, लाल गडद गालिच्यावर तेवढा पडला होता. बाकीचे झगमगीत दिवे विझवण्यात आले होते.

बिगलर अन् हेस कारमधून उतरले. लाल कारपेटवरून चालत ते फिरत्या प्रवेशद्वारातून आत दाखल झाले. रेस्टॉरंटचा प्रमुख संचालक लुईस, त्यांची वाटच पाहात होता.

लुईच्या स्वभावाचं वैशिष्ट्य म्हणजे तो कुठल्याही अनुकूल प्रतिकूल परिस्थितीत सामान्य, अविचलित राहात असे. पण आज मात्र तोही संभ्रमित झालेला दिसला.

लुईसनं या दोन्ही गुप्तहेरांना वरच्या मजल्यावरील बार रूममध्ये आणलं. बाररूममध्ये स्वत: हॅरी ब्राऊनिंग, तोंडात सिगार व हातात ब्रँडीचा ग्लास धरून स्टुलावर बसला होता.

ब्राऊनिंग शरीरानं भव्य नि दणकट होता, पण डोक्यावर मात्र टक्कल. त्याचं वय पंचावन्न वर्षांचं होतं. त्याच्या चेहऱ्यावर दाढी तर नव्हतीच पण मिशाही नव्हत्या. चेहरा उन्हात रापल्यासारखा.

हॅरीची राहणी मात्र अतिशय आकर्षक अन् पाहणाऱ्यावर प्रभाव पाडणारी होती. त्याचा पोषाख श्रीमंती दाखवणारा होता. तो श्रीमंत, बुद्धिमान पण अतिशय दांभिक होता.

''तिकडे आहे ती.'' हॅरीनं अंगुली निर्देश करीत बाररूमच्या उजव्या बाजूकडे जाण्यास सुचवलं. या बाजूला एका वृक्षाच्या लाकडावर नक्षीकाम केलेल्या केबिन्सची एक लांबलचक बांधणी केलेली होती. प्रत्येक केबिनच्या दाराखिडक्यांवर लाल मखमलीचे पडदे लावण्यात आले होते.

''शेवटच्या केबिनमध्ये'' हॅरीनं बोटानं दाखविलं.

बिगलर अन् हेस त्वरेनं तिथं पोचले.

त्या केबिनमध्ये मंद प्रकाश पसरलेला होता अन् एका लांब टेबलावर, सोनेरी केसांची एक स्त्री पडलेली होती. पांढऱ्या रंगाचा बॅकलेस इव्हिनिंग ड्रेस तिनं घातला होता.

बिगलरनं ब्राऊनिंगकडे पाहात विनंतीच्या स्वरात म्हटलं,

''इथं अधिक प्रकाशाची आवश्यकता आहे. करू शकाल एवढं?'' हॅरीनं लुईसकडे पाहाताच, तो बारच्या मागील बाजूस गेला व काही स्वीच ऑन केले.

बिगलर व हेस प्तया केबिनमध्ये होते, ती क्षणातच तीव्र प्रकाशानं उजळून गेली.

बिगलरनं ह्या स्त्रीच्या मानेवरून हात फिरवला व खांद्याला स्पर्श केला. थंडगार स्पर्श त्याला सवयीचा होता; तरीही या क्षणी तो कसासाच वाटला. बराच वेळापासून ती मरून पडल्याचं, त्याच्या लक्षात आलं.

''जोपर्यंत या शवाचे आम्ही फोटो घेत नाही, तोपर्यंत कुणीही हिला स्पर्श करू नये.'' हेस ब्राऊनिंगला म्हणाला. हॅरी सिगार पेटवत बिगलरजवळ पोचला अन् म्हणाला,

''हिला इथून ताबडतोब हटवा. आपल्या शवागारात न्या अन् काय सोपस्कार करायचे ते करा. मला ही पीडा इथे क्षणभरही नको आहे. वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना थोडी जरी शंका आली, तरी ते मला सोलून काढतील. मला हे प्रेसचं झेंगटं नकोय. माझ्या चालू मोसमाचा सत्यानाश झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून म्हणतो आटपा लवकर.''

''या मृत स्त्रीचे फोटो काढल्याशिवाय आम्हाला तिला इथून हलवता येणार नाही,'' हेस म्हणाला, ''हा खुनाचा मामला आहे.''

ब्राऊनिंग संतापला. त्यानं बिगलरला विचारलं,